**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र कमांक/नाविमं/प.मा./ 4129
दिनांकः– 14/11/2022

प्रति,
मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क अधिकारी,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः– सन 2023 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा खाजगी विद्यार्थ्यी नांवनोंदणी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.
संदर्भः– 1. राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं./परीक्षा–3/6204 दि. 11/11/2022.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, सन 2023 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांसाठी विलंब व अतिविलंब शुल्काने नांवनोंदणी अर्ज (फॉर्म नं.17) ऑनलाईन प्रकीयेव्दारे भरण्यासंदर्भातील प्रकटन या पत्रासोबत जोडण्यात आले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. ही विनंती

(श्रीराम चव्हाण)
विभागीय सहसचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै............................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## * प्रकटन *

विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) खाजगी विदयार्थी (फॉर्म नं १७) नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत

फेब्रु-मार्च २०२३ च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने विलंब व अति विलंब शुल्काने स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०१/०९/२०२२ ते दिनांक ३१/१०/२०२२ पर्यंत मुदतवाढीने निश्चित करण्यात आला होता. याबाबत आपणास कळविण्यात येते की, खाजगीरित्या इयत्ता १०वी व इयत्ता १२ वी साठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज अतिविलंब शुल्काने ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याच्या अंतिम मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

### अतिविलंब शुल्कासह निर्धारित अंतिम मुदत

| माध्यमिक शाळांनी / कनिष्ठ महाविद्यालयांनी अति विलंब शुल्क रु.२०/-प्रती विद्यार्थी प्रतीदिन स्विकारुन विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इ.१० वी व इ.१२वी ) |
|---|
| सोमवार दि.१४/११/२०२२ ते शुक्रवार दि.२५/११/२०२२ |

१. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ-** इ.१० वी - **http://form17.mh-ssc.ac.in**

इ.१२ वी - **http://form17.mh-hsc.ac.in**

३. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत.

४. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य (compulsory) आहे.

५. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

६. विद्यार्थ्यांनी अर्ज, विहित शुल्काची पावती व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये लगेचच दुसऱ्या दिवशी जमा करावयाची आहेत.

७. खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-

इ.१०वी -रू.१०००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee) + विलंब + अतिविलंब शुल्क

इ.१२वी- रू. ५००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee) + विलंब + अतिविलंब शुल्क



Scanned with OKEN Scanner